Estd: 1962
NAAC 'A' Grade

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## सुधारित प रि प त्र क

शिवाजी विद्यापीठाचा **५६** वा वर्धापन दिन **दि. १८ नोव्हेंबर २०१८** रोजी साजरा होत आहे. त्या निमित्ताने सदर दिवशी सकाळी ८.३० वाजता विद्यापीठाच्या प्रांगणात मा. कुलगुरू प्रा.(डॉ.) देवानंद शिंदे यांचे शुभहस्ते ध्वजारोहण समारंभ संपन्न होणार आहे. **ध्वजारोहण संपन्न झालेनंतर रॅलीचे आयोजन करणेत आले आहे** तरी विद्यापीठातील सर्व शिक्षक, प्रशासकीय अधिकारी, सेवक वर्ग व विद्यार्थी—विद्यार्थीनींनी वरील समारंभास व रॅलीस उपस्थित रहावे, ही विनंती. वर्धापन दिनाचा कार्यक्रम **राजर्षी शाहू (सिनेट हॉल) सभागृहामध्ये** होईल. तरी सदर कार्यक्रमास उपस्थित रहावे. सदर दिवशी कार्यालयीन व पदव्युत्तर विभागाची कामकाजाची वेळ **सकाळी ८.०० ते ११.३० अशी** राहील, याची सर्वांनी नोंद घ्यावी.

कुलसचिव

जा. क्र./ आस्थापना/ 3002
दिनांक — 16 NOV 2018

प्रति,

१. सर्व अधिविभागप्रमुख, संचालक, समन्वयक
२. सर्व उपकुलसचिव, कायदा अधिकारी, जनसंपर्क अधिकारी, सहाय्यक कुलसचिव, समकक्ष अधिकारी
३. सर्व प्रशासकीय विभागप्रमुख
४. मा. कुलगुरु, मा. प्र—कुलगुरु, मा. कुलसचिव, मा. संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ, व मा. वित्त व लेखा अधिकारी, यांचे कार्यालयास
५. विद्युत अभियंता यांनी आधीच्या व वरील दिवशी योग्य ती कार्यवाही करण्यासाठी.
६. अभियांत्रिकी विभागाने वरील दिवशी कार्यक्रमांच्या ठिकाणी स्वच्छता ठेवण्यासंबंधी संबंधिताना सूचना द्यावी.
७. सुरक्षा विभाग प्रमुखांनी ध्वजारोहणप्रसंगी ध्वजहाताळणीसाठी सुरक्षा रक्षकांची नियुक्ती करावी व परेडची व्यवस्था करावी.
८. नोटीस बोर्ड — १. मुलांचे वसतिगृह क्रमांक १, २ व ३
   २. मुलींचे वसतिगृह क्रमांक १, २ व ३
   ३. तंत्रज्ञान अधिविभाग मुलांचे व मुलींचे वसतिगृह
   ४ डॉ. आप्पासाहेब पवार विद्यार्थी भवन
९. डॉ. एन. व्ही. चिटणीस, विभागप्रमुख, संगीत व ललितकला विभाग यांनी सदरच्या कार्यक्रमाचेवेळी स्वागत गीत व पसायदान गायनाची व्यवस्था करावी.
१०. वाहन विभागाने वाहनांची सोय उपलब्ध करावी व गायक कलाकार व त्यांची वाद्ये यांची ने—आण डॉ. चिटणीस यांचे सूचनेनुसार करावी.
११. इंटरनेट विभाग— सदरचे परिपत्रक संकेतस्थळावर प्रसिध्द करावे.

**टीप—** सदरचे परिपत्रक आपल्या विभागातील सर्व शिक्षक, प्रशासकीय सेवक, विद्यार्थी व विद्यार्थीनी यांच्या निदर्शनास आणून सदर कार्यक्रमास उपस्थित राहण्याबद्दल सूचना द्यावी.

F:\backup\EST_C\EST_C\18NOV\2018\circular.doc